


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ३४ • बुधवार दि.२८ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## विधान परिषद निवडणुकीत महायुतीला तीन, तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला दोन जागा



मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच शिक्षक व पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीत महायुतीने तीन, तर महाविकास आघाडीतील शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दोन जागांवर विजय मिळवला. पुणे शिक्षक, नागपूर पदवीधर आणि अमरावती शिक्षक मतदारसंघांत महायुतीच्या उमेदवारांनी बाजी मारली, तर पुणे पदवीधर आणि छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघांत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले. छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रतापसिंह पाटील यांनी ७३ हजार ९७३ मते मिळवत विजय मिळवला, तर पुणे पदवीधर मतदारसंघात हर्षदा देशमुख जाधव यांनी १ लाख ११ हजार ३४९ मते मिळवत भाजपच्या स्मिता जाधव यांचा पराभव केला. मंगळवारी (२७ ऑक्टोबर) सुरू झालेली मतमोजणी बुधवारी (२८ ऑक्टोबर) निर्णायक टप्प्यावर पोहोचली.

**पुणे शिक्षक मतदार संघात भाजपचा विजय**

पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांनी विजय मिळवला. काँग्रेसचे विद्यमान आमदार जयंत आसगावकर यांना ८ हजार ९६५ मते मिळाली, तर राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार आणि माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनाही पराभवाचा सामना करावा लागला. शिंदे गटाच्या शिवसेनेने पाठिंबा दिलेले अपक्ष उमेदवार सचिन सानप यांच्याशी झालेल्या मैत्रीपूर्ण लढतीमुळे या मतदारसंघातील लढत चर्चेत राहिली. पान ४ वर

## मराठवाडा पदवीधरमध्ये प्रतापसिंह पाटील विजयी

### शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची बाजी

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधान परिषदेच्या छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रतापसिंह पाटील यांनी विजय मिळवत महत्त्वाची कामगिरी केली. त्यांना ७३ हजार ९७३ मते मिळाली, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सतीश चव्हाण यांना ६० हजार ८१८ मतांवर समाधान मानावे लागले. ठाकरे गटाच्या शिवसेनेचे उमेदवार दिलीप घुगे यांना ८ हजार ३६६ मते मिळाली. या निकालामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने छत्रपती संभाजीनगरमध्ये आपले स्थान अधोरेखित केले.




विधान परिषदेच्या पाच शिक्षक व पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीत छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघांत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले.छत्रपती संभाजीनगरमधील निकाल विशेष लक्षवेधी ठरला. येथे प्रतापसिंह पाटील यांनी सतीश चव्हाण यांच्यावर आघाडी घेत विजय मिळवला.त्यामुळे पान ४ वर

## राष्ट्रवादी अ.प.ला आत्मपरिक्षणाची गरज

### प्रफुल्ल पटेलांचा घरचा आहेर

पुणे : विधान परिषद निवडणुकीच्या निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी पक्षनेतृत्वाला



आत्मपरीक्षणाचा सल्ला दिला आहे. जनतेचा विश्वास पुन्हा संपादन करण्यासाठी, पक्षाचे प्राधान्यक्रम निश्चित करण्यासाठी आणि संघटना मजबूत करण्यासाठी कठोर आत्मपरीक्षणाची गरज असल्याचे त्यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

पुणे पदवीधर मतदारसंघातील जागेबाबतचे निर्णय आणि पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा न झाल्याच्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर पटेल यांच्या विधानाला महत्त्व प्राप्त झाले आहे. निवडणुकीतील निकालाने पक्षाच्या रणनीती आणि निर्णयप्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले असून, संघटनात्मक सुधारणांबाबत नेतृत्व काय भूमिका घेते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## नागझरी जलाशयाला भगदाड; दुष्काळात हजारो लिटर पाण्याचा अपव्यय



### तब्बल ४३ वर्षांपासून गाळ उपसलाच नाही

किनवट/प्रतिनिधी-पाटबंधारे उपविभाग किनवटच्या कार्यक्षेत्रातील नागझरी (मध्यम प्रकल्प) जलाशयाच्या (आऊटलेट) सांडव्यातून रात्रंदिवस विसर्ग चालू असल्याने हजारो लिटर पाणी वाया जात आहे. सांडव्यासह तलावाच्या आतील संपूर्ण भिंतीवरील झाडे-झुडपाच्या मुळ्यांमुळे भगदाड तयार होऊन पाणी व्यर्थ वाहून जात आहे. कच्च्या कालव्यांमधून सुद्धा जमिनीत पाणी मुरत असल्याने कालव्याचे सीसीकरण करणे काळाची गरज आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर रोजगार हमी योजनेतून तलावाची आणि पर्यायाने सांडव्याची उंची तर वाढलीच पाहिजे शिवाय गाळ मुक्त जलाशय करण्याची तमाम शेतकऱ्यांची मागणी जोर धरू लागली आहे.

सन १९७२ भयान दुष्काळाच्या छायेत नागझरी जलाशयाची उभारणी करण्यात आली. १९८३ च्या आसपास या प्रकल्पाचे लोकार्पण होऊन ओलीत क्षेत्राच्या पाणी आवर्तनाला सुरुवात झाली. दरवर्षीच पावसाळ्यात वाहून आलेल्या गाळाने जलाशय तुडूंब भरले असून मागील ४३ वर्षांपासून गाळ काढलेला नाही. त्याचा दूरगामी परिणाम हा पाणी साठ्यावर प्रकर्षाने जाणवत राहिला. सिंचनाखालच्या क्षेत्रातही कमालीची आणि लक्षणीय घट निर्माण झाली, ही वस्तुस्थिती आहे. पाट बंधारे उपविभाग किनवट प्रशासनाने कधी या बाबींची समिक्षा केली असेल असे वाटत नाही. उपविभागीय अभियंता, शाखा अभियंते, कालवा निरीक्षकांसह संबंधित यंत्रणेचे अक्षम्य दुर्लक्ष होतांना अगदी स्पष्ट दिसते. शेतकऱ्यांच्या मुळावरच ही यंत्रणा संघटीतरित्या घाव घालीत असेल तर मुख्यमंत्र्यांसह जलसंपदा मंत्रालयाने या प्रकरणाला गांभीर्याने घेण्याची नितांत आवश्यकता असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.नागझरी जलाशयाच्या भिंतीच्या आतील बाजूसह सांडव्यात मोठमोठी झाडेझुडपे झालीत. त्यांच्या मुळ्या खोलवर आणि सभोवताल पसरल्याने भगदाड तयार झाले असून त्यातून प्रचंड पाण्याचा विसर्ग पान ४ वर

## भीमाशंकरमधील वृक्षतोडीची राज ठाकरेंकडून पाहणी

कर्जत: भीमाशंकर परिसरातील साय डोंगरावर हजारो झाडे तोडण्यात आल्याचा आरोप होत असताना, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बुधवारी (२८ ऑक्टोबर) घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. ३२ हजार झाडे तोडण्याचा परवाना दिलाच कसा जातो असा सवालही त्यांनी केला. यावेळी त्यांनी स्थानिक ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या समस्या आणि मागण्यांची माहिती घेतली.



टोरेंट पॉवर कंपनीच्या प्रस्तावित पंप स्टोरेज जल विद्युत प्रकल्पासाठी होत असलेल्या वृक्षतोडीवरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. काही दिवसांपूर्वी परिसरातील ग्रामस्थांनी मुंबईतील शिवतीर्थ येथे जाऊन राज ठाकरे यांची भेट घेतली होती. त्यानंतर राज ठाकरे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देत तोडण्यात आलेल्या झाडांची पाहणी केली. यावेळी मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांच्यासह पक्षाचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. अमित ठाकरे यांनी परिसरात वृक्षारोपणही केले. झाडे तोडून हरित प्रकल्प उभारण्याच्या संकल्पनेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. स्थानिकांच्या मते, लहान प्रकल्पांचे पर्याय उपलब्ध असताना एवढ्या मोठ्या प्रमाणावर जंगलतोड करण्याची गरज काय, असा सवालही त्यांनी केला.

## तीन सुवर्णपदक विजेते पॅरा-ॲथलीट नीरज यादव यांचे निधन

नवी दिल्ली:आशियाई पॅरा गेम्समध्ये तीन सुवर्णपदके जिंकणारे भारतीय पॅरा-ॲथलीट आणि भालाफेकपटू नीरज यादव (४२) यांचे



निधन झाले. मंगळवारी रात्री विषारी पदार्थ प्राशन केल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

डोपिंगविषयक निलंबनामुळे नीरज यांना यंदाच्या आशियाई पॅरा गेम्समध्ये सहभागी होता आले नव्हते. या घटनेचा त्यांच्या मृत्यूशी थेट संबंध असल्याचे अद्याप अधिकृतरीत्या स्पष्ट झालेले नाही.वयाच्या सातव्या वर्षी पोलिओमुळे अपंगत्व आले असतानाही त्यांनी क्रीडाक्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले. २०१८ च्या आशियाई पॅरा गेम्समध्ये भालाफेकमध्ये, तर २०२३ मध्ये भालाफेक आणि थाळीफेकमध्ये त्यांनी सुवर्णपदके जिंकली होती. त्यांच्या निधनामुळे भारतीय क्रीडाविश्वात हळहळ व्यक्त होत आहे.

## आंध्रप्रदेशात चक्रीवादळाचा कहर;तिघांचा मृत्यू

### हजारो नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले

विशाखापट्टणम : बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या अर्णब चक्रीवादळाने आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला जोरदार तडाखा दिला असून, मुसळधार पाऊस आणि ताशी १२५ ते १३५ किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या वादळामुळे आंध्र प्रदेशात तिघांचा मृत्यू झाला असून, ३१ घरांचे नुकसान झाले आहे. आंध्र प्रदेश आणि ओडिशा या दोन्ही राज्यांतून सुमारे ८७ हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. रेल्वे आणि विमानसेवेवरही मोठा परिणाम झाला असून, अनेक गाड्या आणि विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.

विशाखापट्टणममध्ये अवघ्या १८ तासांत २०० मिलिमीटरपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसामुळे सखल भागांत पाणी साचले असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने मदतकार्य वेगाने सुरू केले आहे. आंध्र प्रदेश आणि ओडिशामध्ये सुमारे चार हजार चक्रीवादळ निवारा केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे.चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर विजयवाडा आणि विशाखापट्टणम परिसरातील विमानसेवेवर परिणाम झाला आहे. सुमारे २१ विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. रेल्वे वाहतुकीवरही पान ४ वर

## तत्कालीन गुरुद्वारा सचखंड बोर्ड पुन्हा गठीत करण्याची अधिसूचना प्रसिद्ध



रविंद्रसिंघ मोदी

नांदेड:राज्य सरकारने दि.२९ जून २०२२ रोजी प्रसिद्ध गुरुद्वारा तख्त सचखंड बोर्ड बर्खास्त करण्याच्या अधिसूचनेस स्वतः शासनाने रद्दबातल करत जूना बोर्ड जैसे थे स्थितीत ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दि.२६ ऑक्टोबर २०२६ रोजी शासनाच्या महसूल मंत्रालयाने अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. वरील निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णयाच्या अनुसरुन घेतला आहे.

तत्कालिन सरकारने दि.८ मार्च २०१९ रोजी दी नांदेड शिख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अबचलनगर साहिब बोर्डाची रचना केली होती. मुंबईचे भूपिंदरसिंघ मिनहास यांची शासनाने अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती. त्यावेळी शासनाने सतरा सदस्यीय बोर्ड नियुक्त न करता नऊ सदस्यीय बोर्ड गठित केला होता. नंतर बोर्डाच्या संचालन कालावधीत बोर्डात दोन गट स्थापित झाले होते. आणि त्यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरु झालेत. वरील वाद सरळ मंत्रालयापर्यंत पोहचले. त्यानंतर शासनाने भूपिंदरसिंघ मिनहास यांच्या अध्यक्षतेत असलेले बोर्ड बर्खास्त केले. ज्यावेळी बोर्ड बरखास्त करण्यात आले होते. त्यावेळी बोर्डाच्या सदस्यांची संख्या आठ राहिली होती. बोर्डाचा कार्यकाळ पूर्ण न करता बोर्ड बरखास्त करण्यात आले असल्याचे सांगून तत्कालीन बोर्डाचे सदस्य परमज्योतसिंघ चाहल आणि सचिव रविंदरसिंघ बुंगाई यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल करुन तत्कालीन बोर्डास आणखीन वेळ मिळावा अशी विनंती केली होती. २०२५ मध्ये उच्च न्यायालय खंडपिठातर्फे तसा निर्णय देण्यात आला होता. पण महाराष्ट्र शासनाने बोर्ड बहाल न करता निर्णयास आव्हान दिले. नंतर रविंदरसिंघ बुंगाई यांनी महाराष्ट्र शासनाद्वारे निर्णयाची अवमानना होत असल्याची याचिका दाखल केली. त्यास अनुकूल असे निर्णय झाले. न्यायालयाच्या अवमाननेची टांगती तलवार पाहता महसूल विभागाने दि.२६ ऑक्टोबर २०२६ रोजी अधिसूचना जारी करत जूना बोर्ड गठीत करण्याची अधिसूचना जारी केली.

### नांदेडचा अध्यक्ष करावा

गुरुद्वारा बोर्डाचे तत्कालीन सदस्य स.गुरमीतसिंघ महाजन आणि सदस्य स. मनप्रीतसिंघ कुंजीवाले यांनी निर्णयाचे स्वागत केले आहे. या संदर्भात प्रतिक्रिया देतांना त्यांनी म्हटले की, शासनाने बोर्ड बहालीनंतर आता नांदेडच्या स्थानीक सदस्यामधून अध्यक्ष करावा किंवा तशी मुभा उपलब्ध करुन द्यावी. नांदेडच्या गुरुद्वारा बोर्ड संस्थेस चांगल्या व्यवस्थापनास उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानीक व्यक्ती अध्यक्ष व्हायला हवी असे त्यांनी म्हंटले आहे.

तत्कालीन सचिव रविंदरसिंघ बुंगाई यांनी तत्कालीन बोर्ड पूनर्बहाल व्हावा या साठी मोठे परिश्रम केले. त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत म्हंटले आहे की, तत्कालीन बोर्डाची कालावधि पर्याप्तपणे मिळाला नसल्याने आम्हाला न्यायालयात धाव घ्यावी लागली. कोविड संक्रमण काळ मध्येच आला. त्यावेळी सात ते आठ महीने आम्हाला संधी मिळाली नाही. न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत आहे. आमच्या प्रयत्नास यश लाभले आहे.

# आरोग्यसेवा बाजाराच्या दावणीला?

**कोरोनाच्या महामारीने आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व जगाला पटवून दिले. मात्र, त्यानंतर विविध साथींचे आजार उद्भवत असताना सामान्य माणसाची आरोग्यविषयक चिंता कमी होण्याऐवजी वाढत आहे. डॉक्टरांची फी, वैद्यकीय तपासण्या, रुग्णालयांचा खर्च आणि औषधांच्या वाढत्या किमती यांमुळे आजारपणापेक्षा उपचारच अधिक जिकिरीचे ठरत आहेत. औषधांच्या किरकोळ विक्री किमतीतील मोठ्या तफावतीवरून सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारलेला, 'या लुटीचे तुम्ही समर्थन करू शकता का?' हा सवाल म्हणूनच महत्त्वाचा आहे. तो केवळ औषधांच्या किमतींबाबतचा प्रश्न नसून देशाच्या आरोग्य व्यवस्थेच्या प्राधान्यक्रमांवर बोट ठेवणारा आहे. जागतिकीकरणाच्या लाटेत आरोग्यसेवाही बाजारपेठेतील वस्तू बनत चालली आहे की काय, असे चित्र निर्माण झाले आहे. खासगी आरोग्य सेवेतील आधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञानाचे महत्त्व नाकारता येणार नाही; मात्र, उपचारांची गुणवत्ता केवळ रुग्णाच्या आर्थिक क्षमतेवर अवलंबून राहणे चिंताजनक आहे. पैसा असेल तर उत्तम उपचार आणि नसेल तर आजाराशी झुंज, अशी विषम परिस्थिती आरोग्याच्या मूलभूत संकल्पनेलाच छेद देणारी आहे. आरोग्य ही चैनीची बाब नसून प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज आहे. महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील त्रुटीही याच वास्तवाकडे लक्ष वेधतात. सरकारी रुग्णालयांत दाखल झालेल्या रुग्णांना काही वेळा औषधे बाहेरून विकत घ्यावी लागतात. रुग्णालयांत अस्वच्छतेबाबतही वारंवार प्रश्न उपस्थित होतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांनी उपचारांसाठी सरकारी रुग्णालयांचा आधार घ्यायचा आणि तिथेच औषधांसाठी बाहेर धावपळ करायची, ही विसंगती आहे. आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णाला स्वच्छ परिसर, आवश्यक औषधे आणि वेळेवर उपचार मिळणे ही अपेक्षा आहे; उपकार नव्हे.सरकारी रुग्णालये म्हणजे केवळ इमारती आणि खाटा नव्हेत, तर गरीब, शेतकरी, कामगार आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी आशेचा आधार आहेत. ही व्यवस्था कमकुवत झाली, तर खासगी रुग्णालयांचा खर्च न पेलणाऱ्या नागरिकांसमोर उपचारांचा प्रश्न अधिक गंभीर होतो. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील दुर्लक्षाचा परिणाम रुग्णापुरता मर्यादित राहत नाही; तो संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्यावर आघात करतो. औषधनिर्मिती कंपन्यांना संशोधन, उत्पादन आणि वितरणासाठी खर्च येतो. त्यांना रास्त नफा मिळण्यास विरोध असण्याचे कारण नाही. मात्र, जीवनावश्यक औषधांच्या किमतीत अवाजवी तफावत असेल, तर तिचे समर्थन करता येणार नाही. एकाच औषधाच्या वेगवेगळ्या ब्रँडच्या किमतींत एवढा फरक का असतो? उत्पादनखर्च आणि किरकोळ किंमत यांतील अंतर कितपत रास्त आहे? वितरण साखळीत नफ्याचे प्रमाण किती आहे? या प्रश्नांची पारदर्शक उत्तरे मिळाली पाहिजेत. राष्ट्रीय औषध मूल्यनिर्धारण प्राधिकरणासारख्या संस्थांनी किमतींवर प्रभावी देखरेख ठेवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणे आवश्यक आहे. याचबरोबर सरकारी रुग्णालयांत आवश्यक औषधांचा पुरेसा साठा, स्वच्छता, पुरेसे वैद्यकीय कर्मचारी आणि आधुनिक तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात. औषध खरेदी व वितरणातील त्रुटी दूर करून रुग्णांना बाहेरून औषधे घेण्याची वेळ येऊ नये, याची काळजी घ्यावी. प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून जिल्हा रुग्णालयांपर्यंत सेवा सक्षम झाल्यास नागरिकांना वेळेवर उपचार मिळतील आणि मोठ्या रुग्णालयांवरील ताणही कमी होईल. सार्वजनिक आरोग्य सेवेवरील खर्च हा केवळ सरकारी खर्च नसून नागरिकांच्या आरोग्यातील गुंतवणूक आहे. चांगले उपचार मिळणे जितके महत्त्वाचे, तितकेच ते परवडणेही आवश्यक आहे. औषधांच्या किमतींवर नियंत्रण, सार्वजनिक रुग्णालयांचे सक्षमीकरण आणि खासगी आरोग्य सेवेतील अवाजवी खर्चावर देखरेख या तिन्ही आघाड्यांवर शासनाने काम केले पाहिजे. आरोग्यसेवा ही नफ्याच्या गणितात अडकून राहिली, तर सामान्य माणसाला आजाराशी लढतानाच आर्थिक संकटाशीही झुंजावे लागेल. सर्वोच्च न्यायालयाचा सवाल हा केवळ सरकारकडून खुलासा मागणारा नाही; तो आरोग्य व्यवस्थेच्या जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. शासनाचे यश आधुनिक रुग्णालयांच्या संख्येवर नव्हे, तर शेवटच्या माणसाला दर्जेदार आणि परवडणारे उपचार मिळतात की नाही, यावर ठरले पाहिजे. औषध कंपन्यांचा नफा महत्त्वाचा असला, तरी रुग्णाचा जीव आणि त्याचे आर्थिक अस्तित्व अधिक महत्त्वाचे आहे. आरोग्यसेवा हा बाजारपेठेतील व्यवहार नसून सामाजिक बांधिलकीचा विषय आहे. ही जाणीव धोरणांत आणि अंमलबजावणीत उतरविणे, हेच शासनकर्त्यांचे आद्य कर्तव्य आहे.**

# दुष्काळ निवारण्यासाठी खारीचा वाटा उचलूया



दुष्काळ म्हणजे केवळ पाऊस कमी पडणे नव्हे. पाण्याची टंचाई, शेतीच्या उत्पन्नात घट, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, पशु पक्षांचा जगण्याचा प्रश्न,वाढता घरखर्च आणि रोजगाराच्या संधींवर होणारा परिणाम, असे त्याचे अनेक पैलू आहेत. मराठवाडा, विदर्भ आणि लगतच्या काही भागातील जनतेला दुष्काळाचे चटके वारंवार सहन करावे लागतात. अशा वेळी शासनाच्या मदतकार्याबरोबरच नागरिकांनीही उपलब्ध साधनसंपत्तीचा जपून वापर करणे आवश्यक आहे. जुन्या पिढीने अनुभवातून सांगितलेले एक वाक्य आजही महत्त्वाचे आहे, दुष्काळ सगळ्यांना काटकसर शिकवतो! मात्र, ही काटकसर नेमकी कशी करावी, हे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

**पाण्याचा अपव्यय टाळा, काटेकोर नियोजन करा:-** दुष्काळात प्रत्येक थेंब महत्त्वाचा असतो. पाण्याचे दुर्भिक्ष होऊ शकते हे आपल्या प्रत्येकाच्या लक्षात असले पाहिजे. आपण पाणी कमी वापरल्याने काय फरक पडणार हा प्रश्न पहिले मनातून काढून टाकणे आवश्यक आहे. घरातील गळणारे नळ त्वरित दुरुस्त करावेत. दात घासताना, दाढी करताना किँवा भांडी घासताना नळ सतत सुरू ठेवू नये. आंघोळीसाठी शॉवरऐवजी बादलीचा वापर करावा. वाहन धुण्यासाठी पाइपऐवजी बादली वापरावी. भाजी धुण्यासाठी वापरलेले पाणी झाडांना वापरता येईल. घरातील पाण्याच्या टाकीला स्वयंचलित नियंत्रण किँवा ओव्हरफ्लो रोखण्याची व्यवस्था करावी.

**पिण्यासाठी पाण्याला प्राधान्य:-** पिण्याचे व स्वयंपाकाचे पाणी प्राधान्याने राखून ठेवावे. उपलब्ध पाण्याचा वापर पिणे, स्वयंपाक, स्वच्छता आणि इतर कामांसाठी आवश्यकतेनुसार विभागून करावा. पिण्याचे पाणी स्वच्छ, झाकलेल्या भांड्यात साठवावे. पाणीटंचाई असताना पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेशी तडजोड करू नये.

**सार्वजनिक पुरवठ्यांवर नजर ठेवणे:-** गावांमध्ये सार्वजनिक नळांवरील गळती थांबवणे, पाणीपुरवठ्याच्या वेळापत्रकाचे पालन करणे आणि पाण्याचे समान वाटप सुनिश्चित करणे, ओलीतासाठी ठिबक सिंचनाचा वापर करणे, शेततळी, नालाबांध, बंधारे आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या उपाययोजना स्थानिक परिस्थितीनुसार राबवाव्यात. रोजगार हमीच्या कामांतून जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्यासाठी ग्रामपंचायत आणि प्रशासनाशी समन्वय साधावा.पुढील पावसाळ्यात भूजल पुनर्भरण करता यावे, यासाठी आवश्यक कामांचे नियोज आजपासून करावे. त्यासाठी बंधारे, छोटे बांध,नाला खोलीकरण रुंदीकरण असे उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील प्रत्येक घरावर टीन असो वा कवेलू त्यावरील पाणी जमिनीत मुरेल याचे नियोजन करण्याची सूचना देखील हा दुष्काळ करतो आहे हे प्रत्येकाने लक्षात घेणे आवश्यक आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंग आता प्रत्येक घरासाठी अनिवार्य स्वतः करणे महत्त्वाचे ठरते. भूजल पुनर्भरणासाठी या छोट्या उपाययोजना अधिक आवश्यक ठरतात.

**दुष्काळाचा सर्वाधिक परिणाम शेतीवर होतो:-** आपली सर्व अर्थव्यवस्था ही शेतीवर आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था उत्पादनावरून अवलंबून असते. त्यामुळे दुष्काळ पडू शकतो हे गृहीत धरून उपलब्ध पाणी, जमिनीतील ओलावा, पीकस्थिती आणि संभाव्य उत्पन्न यांचा हिशेब करणे गरजेचे आहे. पुढील पेरणीपूर्वी कृषी विभागाच्या सल्ल्याने कमी पाण्यात येणारी, स्थानिक हवामानाला अनुरूप पिके निवडावीत. पाणी उपलब्ध नसताना जास्त पाणी लागणाऱ्या पिकांसाठी मोठी गुंतवणूक करण्यापूर्वी संभाव्य नुकसानाचा विचार करावा. शक्य असेल तेथे ठिबक किँवा तुषार सिंचनाचा वापर करावा. ठिबक सिंचनातून पाणी थेट पिकांच्या मुळांजवळ पोहोचते. सिंचनासाठी सकाळी लवकर किँवा संध्याकाळी योग्य वेळ निवडावी आणि शेतातील पाइप, व्हॉल्व्ह व जोडण्यांमधील गळती थांबवावी. जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी पिकांचे अवशेष किँवा योग्य आच्छादन वापरावे. गरजेपेक्षा जास्त पाणी देणे टाळावे.

**माती परीक्षण;चाऱ्याची उपलब्धता:-** खते आणि कीटकनाशके अंदाजाने वापरण्याऐवजी माती परीक्षण, पीकस्थिती आणि कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार वापरावीत. बियाणे, खते आणि औषधे एकत्रित खरेदी करणे, यंत्रसामग्री सामायिक वापरणे आणि शेतकरी गटांच्या माध्यमातून खर्च विभागून घेणे शक्य आहे. पीकविमा, शासकीय मदत आणि रोजगार योजनांची माहिती अधिकृत यंत्रणांकडून घ्यावी.

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती),विभागीय
माहिती कार्यालय छत्रपती संभाजीनगर

पशुधन आणि चाऱ्याची बचत करावी, जनावरे ही ग्रामीण कुटुंबांची महत्त्वाची संपत्ती आहे. उपलब्ध चारा मोजून वापरावा आणि चाऱ्याची नासाडी होणार नाही, अशी व्यवस्था करावी. पिकांचे सुरक्षित अवशेष योग्य पद्धतीने साठवावेत. शक्य असल्यास चारा उत्पादनासाठी नियोजन करावे. जनावरांना स्वच्छ पाणी नियमित उपलब्ध करून द्यावे. त्यांच्या आहारात अचानक बदल करू नये आणि पशुवैद्यकीय सल्ल्यानुसार काळजी घ्यावी. चाऱ्याची टंचाई गंभीर झाल्यास चारा छावण्या किँवा अन्य शासकीय सुविधांसाठी स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा.

**रोजगार, बचत आणि सामूहिक मदत:-** शेतीतून उत्पन्न कमी झाल्यास ग्रामपंचायत आणि रोजगार हमी यंत्रणेकडे उपलब्ध कामांची माहिती घ्यावी. पात्रतेनुसार रोजगार व मदत योजनांसाठी अर्ज करावा. घरातील उपलब्ध धान्याचे नियोजन करावे. आर्थिक अडचणीच्या काळात जास्त व्याजाचे कर्ज घेण्याऐवजी अधिकृत मदत आणि उपलब्ध पर्याय तपासावेत.

दुष्काळ हा केवळ शेतकऱ्यांचा प्रश्न नसून संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्रश्न आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिक, सामाजिक संस्था, व्यापारी आणि सेवाभावी संघटनांनी गरजू कुटुंबांना अन्नधान्य, शैक्षणिक साहित्य किँवा आवश्यक वस्तूंच्या स्वरूपात मदत करावी. ही मदत स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून आणि लाभार्थ्यांची प्रतिष्ठा जपत करावी.

**घरखर्चाचे नियोजन करा; अनावश्यक खर्च टाळा:-** दुष्काळात उत्पन्न कमी होण्याची शक्यता असताना कुटुंबाने मासिक खर्चाचा प्राधान्यक्रम ठरवावा. अन्नधान्य, औषधे, शिक्षण, वीज आणि आवश्यक प्रवास यांसाठीचा खर्च प्रथम बाजूला ठेवावा. अनावश्यक खरेदी, महागड्या वस्तू, दिखाऊपणा आणि परवडत नसताना घेतलेले कर्ज टाळावे. बाजारात जाण्यापूर्वी आवश्यक वस्तूंची यादी करावी. काटकसरीने खरेदी करायचे आहे आवश्यक तीच खरेदी करायची आहे हे लक्षात घेऊनच बाजारात पाऊल ठेवणे उपयुक्त ठरेल.आठवड्याचा भाजीपाला आणि महिन्याचा किराणा नियोजन केल्यास अनावश्यक खरेदी कमी होते. यंदाच्या दिवाळीत फटाके, महागडे कपडे, सजावटीच्या वस्तू आणि अनावश्यक भेटवस्तूंवरील खर्च कमी करता येईल. सणाचा आनंद साधेपणानेही घेता येतो. आज वाचवलेली रक्कम पुढील काही महिन्यांतील अडचणींसाठी उपयोगी पडू शकते. मात्र, काटकसर करताना पोषण, आरोग्य आणि मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नये.

**काटकसर हीच सामूहिक ताकद:-** दुष्काळ पूर्णपणे टाळणे प्रत्येकाच्या हातात नसले, तरी त्याचे परिणाम कमी करण्यासाठी प्रत्येक जण काही ना काही करू शकतो.अगदी समूह शेती सारख्या सहकार तत्वाचा स्वीकार करणे. सार्वजनिक पानवठ्यांचा योग्य वापर करणे, घरात पाण्याची बचत, शेतीत खर्चाचे नियोजन, पशुधनाची काळजी, अनावश्यक खरेदीला आळा आणि गरजूंच्या मदतीला धावून जाणे, या कृती संकटाची तीव्रता कमी करू शकतात.

सण-उत्सवात आपल्या शेजाऱ्याची परिस्थिती समजून घेणे आणि शक्य ती मदत करणे हेही सामाजिक दायित्व आहे. अशावेळी सण देखील सामूहिकरित्या साजरे केले जाऊ शकतात. एकत्रित येऊन साधेपणाने उत्सव साजरा केला जाऊ शकतो. त्यासाठी पुढाकार कोण घेईल याची वाट पाहता एक पाऊल पुढे टाकून गावागावात वेगवेगळे उपक्रम राबविणे गरजेचे ठरते.

**दुष्काळ भविष्याची बांधणी करतो:-** यापूर्वीही अनेकदा दुष्काळाचा सामना दुष्काळी प्रदेशाने केला आहे.मात्र,ज्याच्याकडे मदतीची दानत आहे त्यांनी इतरांना मदतीसाठी हात पुढे केला आहे. सामान्यातला सामान्यमाणूस एकत्रित येऊन अशा वेळी असामान्य कामे करू शकतात. त्यामुळे विवाहसोहळ्यांना सामूहिक स्वरूप देण्यापासून तर सण उत्सवही एकत्रित करण्यापर्यंत अनेक उपाययोजना गावागावात होऊ शकतात. खरे तर अशी परिस्थिती भविष्यात उद्भवू नये यासाठी निसर्ग दुष्काळाच्या नावाने एक संधीही निर्माण करत असते. मराठवाड्यातील प्रत्येक गाव पाणीदार व्हावे, प्रत्येक गावाचे पाण्याचे ऑडिट व्हावे, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजना करण्यासाठी या दुष्काळात चिंतन होणे गरजेचे आहे.शासनस्तरावरून सर्वांची काळजी घेतली जाते मात्र गावे जर स्वावलंबी बनली तर अशावेळी प्रशासनालाआणखी मदत होते. त्यामुळे या दुष्काळात खर्चापासून पाण्याच्या बचतीपर्यंत थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे दुष्काळावर मात करणाऱ्या घटकांसाठी प्रयत्न करणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे.

# माजी प्राचार्य बाबुराव कदम यांचा हृदय सत्कार



नांदेड/प्रतिनिधी-अनुदानित महाविद्यालयातील सेवा सोडून विना अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य म्हणून नेमणूक स्वीकारून समर्थपणे आव्हान पेलले आणि आज सेवानिवृत्त झाल्यानंतरही तेवढ्याच आपुलकीने आस्थेवाईकपणे विचारपूस करणारी माणसं मला भेटली यातच मी स्वतःला धन्य समजतो, असे भावोत्कट विचार सेवा निवृत्त प्राचार्य बाबूराव कदम यांनी व्यक्त केले.

ते आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या सत्कार समारंभात भावविवश होऊन बोलत होते. हा कार्यक्रम अर्धापूर येथील पानसरे महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि माजी विद्यार्थी यांनी नांदेड येथील हाटेल नैवेद्यम येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी माजी प्राचार्य पी.एम.कुंभेकर, माजी प्राचार्य रामनाथ पबितवार (सपत्नीक), माजी प्राचार्या भारती पोळ, माजी प्राचार्य आनंदराव मंगनाळे, माजी प्राचार्य डॉ.गणेशसिंह चौहान (सपत्नीक), माजी प्राध्यापक हनुमानदास जाजू (सपत्नीक), माजी क्रिडा संचालक आनंदराव मांजरमकर (सपत्नीक), माजी प्राचार्य डॉ. राम जाधव, सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ.कल्पना जाधव, लेखापाल गंगाधरराव पापूलवार, माजी विद्यार्थी तथा दैनिक सामनाचे जिल्हा प्रतिनिधी विजय जोशी, सेवानिवृत्त प्राध्यापक आप्पाराव चव्हाण (लोहा), माजी ग्रंथपाल प्रा.गंगाधर होरके (भोकर), प्रा.आर.ई. मठवाले (पूर्णा), प्रा. वासुदेवराव गिजरे ( नांदेड), एम. जी मठ्ठमवार, गोविंद मांजरमकर, सेवानिवृत्त कोषागार अधिकारी एफ.आर. शेख, (पूर्णा), जि.प.चे माजी शिक्षणाधिकारी किशन सोने, माजी कृषी अधिकारी एस. एल. कदम, सुभाष चंपतराव कदम (वारंगा फाटा), शिवाजीराव पोरडवार (अर्जापूर) आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. यावेळी प्राचार्य बाबूराव कदम यांचा उपस्थितांनी सपत्नीक शाल, श्रीफळ आणि बुके देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य डॉ. राम जाधव यांनी करून उपस्थितांचे आभार मानले. सस्नेह भोजनाचा आस्वाद घेत सर्व उपस्थितांनी एकमेकांना पुन्हा भेटण्याची इच्छा व्यक्त केली.पानसरे परिवारातील सर्व सहकाऱ्यांच्या वतीने आयोजित केलेल्या या हृद सत्काराच्या नियोजनाबद्दल सर्वांनी आभार मानले.

# स्वारातीम विद्यापीठात ३० रोजी 'आविष्कार' महोत्सवाचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांमधील संशोधन गुणांना प्रोत्साहन मिळावे यासाठी सुरू करण्यात आलेला 'आविष्कार संशोधन महोत्सव' दि.३० ऑक्टोबर, २०२६ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील औषधनिर्माणशास्त्र संकुल (स्कूल ऑफ फार्मसी) येथे आयोजित करण्यात आला आहे.

जिल्हास्तरावर विजेते ठरलेले चार जिल्ह्यातील १६४ संशोधक विद्यार्थी विद्यापीठस्तरीय 'आविष्कार' संशोधन महोत्सवात पोस्टर व प्रोजेक्टद्वारे आपली संकल्पना सादर करणार आहेत.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन तसेच कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या संशोधन महोत्सवात मानव्यविज्ञान भाषा व ललित कला, वाणिज्य व्यवस्थापन आणि विधी, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यक व औषधनिर्माण, कृषी व पशुसंवर्धन या सहा विभागांमध्ये विद्यार्थी आपले संशोधन सादर करणार आहेत. भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल हे महोत्सवाचे आयोजक आहेत.या महोत्सवाचे उद्घाटन सकाळी १०:०० वाजता होणार असून सायंकाळी ४:०० वाजता अधिसभा सभागृहामध्ये पदवी, पदव्युत्तर आणि पदव्युत्तर पदवी या विभागातील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.


मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४१०/२०२६
(CNR No.MHND10-001389-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | लक्ष्मीबाई भ्र.पांडुरंग आगबोटे | वय-७२ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | दिलीप पि.पांडुरंग आगबोटे | वय-४७ वर्षे | धंदा-मजुरी |
| ३ | जयानंद पि.पांडुरंग आगबोटे | वय-४२ वर्षे | धंदा-मजुरी |
| ४ | दशरथ पि.पांडुरंग आगबोटे | वय-३५ वर्षे | धंदा-मजुरी |
| ५ | माधव पि.पांडुरंग आगबोटे | वय-३२ वर्षे | धंदा-मजुरी |

सर्व रा.राऊतखेडा ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडिल नामे पांडुरंग पि.दशरथ आगबोटे हे होते. ते दिनांक १५/११/२०२५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, पांडुरंग पि.दशरथ आगबोटे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत पांडुरंग पि.दशरथ आगबोटे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत पांडुरंग पि.दशरथ आगबोटे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२५/११/२०२६

आज रोजी दि.१९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार



सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# ग्रामीण भागातील रस्ते व आरक्षणांच्या विकासासाठी टीडीआर लागू करावे

## खा.अशोक चव्हाण यांच्याकडे माजी महापौर सौ.जयश्री ॲड.निलेश पावडेंची मागणी



नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्रातील ग्रामीण व प्रादेशिक योजना क्षेत्रातील रस्ते आणि सार्वजनिक आरक्षणांच्या विकासाला गती देण्यासाठी एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (यूडीसीपीआर-२०२०) मधील हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) प्रक्रिया जशीच्या तशी लागू करावी, अशी मागणी माजी महापौर सौ. जयश्री पावडे आणि ॲड.निलेश पावडे यांनी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोक चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

ग्रामीण भागात रस्ते, शाळा, रुग्णालये, मैदाने यांसारख्या सार्वजनिक सुविधांसाठी प्रादेशिक योजनेत आरक्षित असलेल्या जमिनींचा विकास अनेकदा भूसंपादनासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे रखडतो. या पार्श्वभूमीवर ग्रामीण क्षेत्रातही टीडीआर प्रक्रिया लागू केल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांवरील आर्थिक भार कमी होईल आणि जमीनमालकांना त्यांच्या जमिनीच्या मोबदल्यात विकास हक्क प्रमाणपत्र मिळू शकेल, असे निवेदनात म्हटले आहे. महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रांप्रमाणे ग्रामीण आणि प्रादेशिक योजना क्षेत्रासाठीही प्रभावी यंत्रणा निर्माण करावी. यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत जिल्हाधिकारी किंवा संबंधित प्रादेशिक योजना कार्यालयाला विकास प्राधिकरण अथवा नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, या प्राधिकरणाला प्रादेशिक योजना क्षेत्रातील आरक्षित जमिनी आणि प्रस्तावित रस्त्यांच्या बदल्यात टीडीआर निर्माण करण्याचे व त्याचा वापर करण्यास परवानगी देण्याचे अधिकार द्यावेत, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे वर्षानुवर्षे कागदावर असलेली आरक्षणे विकसित होतील, ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विस्तारेल, दळणवळण व रोजगाराच्या संधी वाढतील आणि भूसंपादनासाठी शासनावर पडणारा आर्थिक भार कमी होईल. त्याचबरोबर शेतकरी व जमीनमालकांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळण्यास मदत होईल. राज्याच्या समतोल विकासासाठी यूडीसीपीआर-२०२० मध्ये आवश्यक सुधारणा करून या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती सौ. जयश्री पावडे व ॲड.निलेश पावडे यांनी केली आहे.

# बोर्ड लावण्यावरुन जेष्ठावर कत्ती,दगडाने प्राणघातक हल्ला

देगलूर/प्रतिनिधी-देगाव रोडवरील शेत शिवारात बोर्ड लावण्याच्या कारणावरून वृद्धाला शिवीगाळ करत कत्ती व दगडाने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी देगलूर पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहिती-नुसार, मोहम्मद अल्फाफ मोहम्मद शरीफ (वय ६१,) रा. जामा मशीद जवळ, देगलूर हे दि.२५ ऑक्टोंबर रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास देगाव रोडवरील आपल्या शेतात असताना, आरोपी गंगाराम दत्ता बंगरवार व गोपाळ बंगरवार दोघे रा. गोकुळनगर, देगलूर) यांनी संगमत केले. तू शेतात बोर्ड का लावलास? असा जाब विचारत त्यांनी शिवीगाळ केली व कत्ती तसेच दगडाने हातावर मारहाण करून गंभीर दुखापत करून जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी मोहम्मद अल्ताफ यांच्या फिर्यादीवरून देगलूर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सूर्यवंशी करीत आहेत.

# शेतकरी चंद्रकांत शिंदे हत्या प्रकरणी पोलीसांकडून एसआयटीची स्थापना

नांदेड/प्रतिनिधी-खाजगी फायनान्सच्या संचालक व कर्मचाऱ्यांनी केलेल्या मारहाणीत माळकौठा ता.मुदखेड येथील शेतकरी चंद्रकांत दगडूजी शिंदे यांचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणाच्या चौकशीसाठी पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी विशेष तपास पथक (एसआयटी) ची स्थापना केली आहे.



माळकौठा येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांनी नांदेड शहरातील हिंगोली गेट भागात असलेल्या के.एफ.इंटरप्रायजेस या फायनान्सच्या मालकाकडून व्याजाने पैसे घेतले होते. काही कारणामुळे चंद्रकांत शिंदे यांना व्याजाची रक्कम परतफेड करता आली नाही. दि.२२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी माळकौठा येथील मारोती मंदिरा जवळून खाजगी फायनान्सच्या कार्यालयात काम करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांनी चंद्रकांत शिंदे यांना जबरदस्तीने दुचाकीवर बसवून हिंगोली गेट येथील के.एफ. इंटरप्रायजेस कार्यालयात आणले होते. तेथे त्यांना दोन दिवस डांबून ठेवून मारहाण करण्यात आली. या मारहाणीत चंद्रकांत शिंदे यांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात के.एफ.इंटरप्रायजेस या फायनान्सच्या मालकासह कर्मचाऱ्यांविरुध्द वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग व वजिराबाद पोलीसांनी या प्रकरणी जयकुमार उर्फ भैय्या गायकवाड (वय २२) रा. गोपाळचावडी, नांदेड, शेख आमेर शेख साहेब हुसेन (वय २५) रा.खुदबेनगर चौरस्ता,नांदेड, इम्रानखान शाहेबाजखान (वय ४०) रा. गोवर्धनघाट, नांदेड, शेख मुद्दसीर शेख खदीर (वय २४) रा. पिरबुऱ्हाणनगर, नांदेड या चार जणांना अटक करण्यात आली आहे. या घटनेतील मुख्य आरोपी के.एफ. इंटरप्रायजेस फायनान्सचा मालक व अन्य काही आरोपी फरार आहेत. या गुन्ह्यातील फरार आरोपींना अटक करण्यासाठी व तपासासाठी पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी नांदेड शहराचे पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैंजने यांच्या नेतृत्वाखाली तपास पथक गठीत करण्यात आले. या तपास पथकात तीन पोलीस अधिकारी व सहा पोलीस जमादारांचा समावेश आहे. अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव हे या विशेष तपास पथकावर देखरेख ठेवणार आहेत.



वाडी येथील ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी संपन्न होणार आहे. नियोजीत कार्यक्रमस्थळी आ.हेमंत पाटील यांनी भेट देवून तयारीचा आढावा घेतला. यावेळी आ.बालाजी कल्याणकर, आ.आनंदराव बोंढारकर, जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, नारायण कदम, बाळासाहेब पावडे व इतर उपस्थित होते.

# पोलीस अधीक्षक हे पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते यांना भेटीविनाच परतले

हदगाव/प्रतिनिधी-पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन हे २६ ऑक्टोबर रोजी काही कार्यालयीन कामकाजा निमित्तने हदगाव पोलीस ठाण्यात आले होते. बराच वेळ पोलीस स्टेशन मध्ये थांबुन त्यांनी कामकाजाची पाहणी केली. त्यांच्या या दौऱ्या दरम्यान हदगाव शहरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक पत्रकार यांची त्यांच्याशी मात्र भेट होऊ शकली नाही. त्यामुळे शहरातील विविध सामाजिक प्रश्न, शैक्षणिक समस्या आणि कायदा-सुव्यवस्थेशी संबंधित विषय मांडण्याची संधी हुकली आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन हदगाव पोलीस ठाण्यात आले असताना काही स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिय विविध माध्यमांच्या पत्रकारांनी त्यांची भेट घेण्यासाठी स्थानिक पोलिसांच्या माध्यमातून संपर्क साधला होता. पोलीस ठाण्यातील कार्यालयीन कामकाज पूर्ण झाल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक संबंधितांना भेटीसाठी वेळ देतील, अशी माहिती पत्रकारांना देण्यात आली. त्यामुळे सामाजिक



कार्यकर्ते आणि पत्रकार त्यांची भेट होण्याच्या अपेक्षेने बराच वेळ प्रतीक्षा करत होते. मात्र, त्यानंतर पोलीस ठाण्यात संपर्क साधला असता, पोलीस अधीक्षक शहरातील विश्रामगृहात भोजनासाठी गेल्याचे सांगण्यात आले. पुढे ते नांदेडकडे रवाना झाल्याची माहिती मिळाली. परिणामी, भेटीसाठी प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांची आणि पत्रकारांची भेट होऊ शकली नाही. नियोजित भेट का होऊ शकली नाही की, भेट होऊ दिली नाही याबाबत मात्र स्थानिक स्तरावर आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पोलीस अधीक्षकांसोबत होणाऱ्या प्रथमच संभाव्य भेटीत हदगाव शहरातील सामाजिक व शैक्षणिक समस्यांसह घडलेल्या विविध घटनां बाबत चर्चा करण्याचे नियोजन होते. तसेच शहरातील मुख्य रस्त्यावर पोलीस चौकी उभारण्याची गरज, वाढत्या सायबर गुन्ह्यांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे आणि कायदा-सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्या संदर्भातील विषयही त्यांच्या निदर्शनास आणून देण्याची अपेक्षा होती. पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी तालुक्यातील वाकोडा या गावात आयोजित सत्कार समारंभाला उपस्थित राहून ग्रामस्थांना संबोधित केले. त्यामुळे त्यांच्या हदगाव दौऱ्यादरम्यान स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार यांची भेट का होऊ शकली नाही, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

# नांदेडमध्ये १४ वर्षीय प्रणव मेंडके बेपत्ता

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून १४ वर्षीय मुलगा बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. प्रणव रामेश्वर मेंडके असे या मुलाचे नाव असून तो इयत्ता नववीत शिक्षण घेत आहे. नातेवाइकांनी शोध घेऊनही तो आढळून न आल्याने पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून, भाग्यनगर पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार प्रणव मेंडके हा सोमवार ५ ऑक्टोबर रोजी पहाटे सुमारे ४.२० वाजण्याच्या सुमारास घरातून निघून गेला. त्यानंतर तो घरी परतला नसल्याचे समोर आले आहे. नातेवाइकांनी त्याचा विविध ठिकाणी शोध घेतला; मात्र तो सापडला नसल्याने अखेर पोलिसांकडे तक्रार करण्यात आली.प्रणव हा मूळचा भोकर तालुक्यातील आमदरी वाडी येथील रहिवासी असून, सध्या तो नांदेड शहरातील छत्रपती चौक परिसरातील मोरेश्वर प्लाझा, प्लॉट क्रमांक ३०१ येथे राहत होता.प्रणवची उंची सुमारे पाच फूट असून, रंग सावळा आणि शरीरबांधा सडपातळ आहे. त्याचा चेहरा लांबट असून, बेपत्ता झाला त्यावेळी त्याने ग्रे रंगाचा हाफ टी-शर्ट, हिरवट रंगाची नाइट पँट परिधान केली होती. तसेच त्याच्या तोंडाला लाल रंगाचा मास्क सदृश बांधलेले कापड आणि पायात सॅन्डल होते. त्याला चहा पिण्याची सवय व मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा बोलता येत असल्याची माहिती पोलिसांच्या शोधपत्रिकेत नमूद करण्यात आली आहे. बेपत्ता प्रणव मेंडके याच्याबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास त्यांनी तात्काळ भाग्यनगर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी केले आहे.


## पाहिजेत

**ड्रेसेस दुकानामध्ये काम करण्यासाठी मुलीं किंवा महिला पाहिजेत.**

**पत्ता :** 'मल्लिका बाय रीमा'
डॉ.नळदकर हॉस्पिटल समोर,
तरोडेकर भाजी मार्केटच्या मागे,वजीराबाद,नांदेड
मो.८२६२८४८२८६, ८४२१३६२६००

CHANGE IN NAME

My (old name) is **DATTATARAY** which now I am, changing as (new name) **DATTATRAY CHIMANAJI CHITKALWAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**DATTATRAY CHIMANAJI CHITKALWAR**
R/o 5-4-566, Vinkar colony Chophala,
Nanded-431604
Mob.no. 9423138405

CHANGE IN NAME

My (old name) is **VYANKATSWAMI** which now I am, changing as (new name) **VYANKATSWAMI GURU NARAYANSWAMI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**VYANKATSWAMI GURU NARAYANSWAMI**
R/o At.Pimpalgaon, post Ghogari Tq.Hadgaon
Dist. Nanded-431712
Mob.no. 8675451111


## जाहीर प्रगटन

५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१४४३/२०२६
विरांश राजेश सुरोशे अ.पा.क.मार्फत पल्लवी संजय पिटलेवार वि.
आयुक्त नां.वा.श.म.न.पा.नांदेड
नोटीस

अर्जदार:- विरांश राजेश सुरोशे (Minor)
(Through his Natural Guardian) पल्लवी संजय पिटलेवार, वयः ३१ वर्ष, रा.विमानतळ रोड गोपाळ नगर, सांवगी बू.,तरोडा बु.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : आयुक्त साहेब,नां.वा.श.म.न.पा.नांदेड

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार, विरांश राजेश सुरोशे (Minor) (Through his Natural Guardian) पल्लवी संजय पिटलेवार वयः ३१ वर्ष, रा.विमानतळ रोड गोपाळनगर, सांवगी बू., तरोडा बु. नांदेड यांचा मुलगा नामे विरांश पि.राजेश सुरोशे यांचा जन्म दिनांक २९/०५/२०२२ रोजी राहत्या घरी झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नामे जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक १०/१२/२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक २७.१०.२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
|---|---|
| कनिष्ठ लिपीक | स्वाक्षरित/- |
| ५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, | सहाय्यक अधिक्षक |
| नांदेड | मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड |

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४२१/२०२६
(CNR No.MHND10-001460-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | गंगासागर भ्र.श्रीहरी वाकोरे | वय-७० वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | विठ्ठल पि.श्रीहरी वाकोरे | वय-५२ वर्षे | धंदा-शेती |

दोघे रा.काटकळंबा ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ चे वडिल नामे श्रीहरी देवराव वाकोरे हे होते. ते दिनांक २३/०८/२०२५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, श्रीहरी देवराव वाकोरे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत श्रीहरी देवराव वाकोरे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत श्रीहरी देवराव वाकोरे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२३/११/२०२६

आज रोजी दि.१९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

| | आदेशावरुन |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **कनिष्ठ लिपीक** | **सहायक अधिक्षक** |
| दिवाणी न्यायालय | सह दिवाणी न्यायालय |
| क.स्तर,कंधार | क.स्तर,कंधार |

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४२२/२०२६
(CNR No.MHND10-001461-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | संजय पि.व्यंकटराव वाकोरे | वय-४७ वर्षे | धंदा-शेती |

रा.काटकळंबा ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे आई नामे पद्मीनबाई भ्र.व्यंकटी वाकोरे हे होते ते दिनांक २४/०७/२०२६ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, पद्मीनबाई भ्र.व्यंकटी वाकोरे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत पद्मीनबाई भ्र.व्यंकटी वाकोरे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत पद्मीनबाई भ्र. व्यंकटी वाकोरे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-०१/१२/२०२६

आज रोजी दि.२२/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

| | आदेशावरुन |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **कनिष्ठ लिपीक** | **सहायक अधिक्षक** |
| दिवाणी न्यायालय | सह दिवाणी न्यायालय |
| क.स्तर,कंधार | क.स्तर,कंधार |

# शेतकरी व मजुरांना धान्यापासून वंचित ठेवणाऱ्या पुरवठा अधिकाऱ्याची चौकशी करा

## कंधार येथे शिवसेनेचे तहसीलदारांना निवेदन

कंधार/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना धान्यापासून वंचित ठेवणाऱ्या तसेच मनमानी कारभार करणाऱ्या पुरवठा अधिकारी यांच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करून त्यांना निलंबित करावे, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने आज दि.२८ रोजी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

कंधार तालुक्यात कोरड्या दुष्काळामुळे शेतकरी व मजूर आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत शासनाच्या माध्यमातून मिळणाऱ्या धान्याचा लाभ गरजू लाभार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे. मात्र, संबंधित पुरवठा अधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना धान्य मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांना धान्यापासून वंचित ठेवणे, लाभार्थ्यांच्या नावावरील धान्य कमी करणे तसेच शासकीय नियमावलीनुसार कामकाज न करता मनमानी पद्धतीने कारभार सुरू असल्याच्या तक्रारींची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. यासंदर्भात संबंधित अभिलेख, अहवाल आणि धान्य वितरणाच्या नोंदी तपासून वस्तुस्थिती स्पष्ट करावी. तसेच स्वस्त धान्य दुकानांची मासिक तपासणी करून प्राधान्य व अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांना नियमानुसार धान्य मिळते की नाही, याची खातरजमा करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.गेल्या आठ महिन्यांपासून आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी, मजूर व सर्वसामान्य जनतेला धान्यापासून वंचित ठेवू नये. पात्र लाभार्थ्यांना त्यांचे हक्काचे धान्य तातडीने उपलब्ध करून द्यावे आणि संबंधित पुरवठा अधिकाऱ्याच्या कामकाजाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख परमेश्वर पाटील जाधव, विधानसभा संघटक लोहा-कंधार गणेश भाऊ कुंभेवाड, शहरप्रमुख अतुल पापीनवार, तालुका संघटक पंडित देवकते यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# शिवसेनेवर संघटनेच्या आधारे हक्क कसा?

## शिवसेना पक्ष,चिन्हावरुन सुप्रिम कोर्टात खडाजंगी



नवी दिल्ली: केवळ संघटनेच्या आधारे पक्षावर हक्क ठरविणे योग्य आहे का? असा सवाल शिवसेना शिंदे गटाच्यावतीने आज झालेल्या सुनावणीच्या युक्तीवादात करण्यात आला.

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावरील हक्काच्या वादासह आमदार अपात्रता प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बाजूने ज्येष्ठ वकील मनिंदर सिंग आणि ध्रुव मेहता यांनी युक्तिवाद केला. पक्षांतर्गत लोकशाही, निवडणूक आयोगाचे अधिकार, आमदारांचे संख्याबळ आणि प्रतोद नियुक्ती या मुद्द्यांवर शिंदे गटाने आपली बाजू मांडत ठाकरे गटाच्या दाव्यांना प्रत्युत्तर दिले. मनिंदर सिंग यांनी पक्षांतर्गत निवडणुकांच्या मुद्द्यावर भर दिला. पक्षाच्या संघटनात्मक रचनेत निवडणुकांना महत्त्व असून, पक्षांतर्गत निवडणुका झाल्या नसतील, तर संघटनेच्या आधारे पक्षावरील हक्क ठरविणे योग्य आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. निवडणूक आयोगाच्या अधिकारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे योग्य नसल्याचे सांगत, संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार आयोगाला राजकीय पक्षांची मान्यता रद्द करण्याचे अधिकार असल्याचा युक्तिवादही त्यांनी केला. पक्षाचे निवडणूक चिन्ह आणि निवडून आलेल्या उमेदवारांचे संख्याबळ महत्त्वाचे असल्याचे नमूद करताना मनिंदर सिंग यांनी सुभाष देसाई प्रकरणाचा संदर्भ दिला. पक्षावर कोणाचे बहुमत आहे, हे ठरविताना संख्याबळाला महत्त्व असल्याची भूमिका त्यांनी मांडली. यानंतर ध्रुव मेहता यांनी आमदार अपात्रता प्रकरणाच्या युक्तिवाद केला. २१ जून रोजी झालेल्या आमदारांच्या बैठकीत एकनाथ शिंदे हे विधिमंडळ पक्षाचे नेते होते. या बैठकीत भरत गोगावले यांची प्रतोद म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यामुळे त्यांचाच व्हीप योग्य असल्याचा दावा त्यांनी केला. ठाकरे गटाच्या याचिकेतील आरोपही निराधार असल्याचे त्यांनी न्यायालयात सांगितले. विधानसभा अध्यक्ष हे दहाव्या अनुसूचीअंतर्गत आमदारांच्या अपात्रतेबाबत निर्णय घेणारे न्यायाधिकरण असल्याचा मुद्दाही मेहता यांनी मांडला. आपल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ त्यांनी राणा प्रकरणातील न्यायनिर्णयाचा दाखला दिला.शिवसेना पक्ष आणि चिन्हावरील हक्कासह आमदार अपात्रतेचा वाद महाराष्ट्राच्या राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला आहे. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीत दोन्ही बाजूंकडून कायदेशीर मुद्दे मांडले जात असल्याने पुढील कार्यवाहीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात मोठी वाढ

नवी दिल्ली:दिवाळीच्या सणापूर्वी केंद्र सरकारचे कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी एक अत्यंत आनंदवार्ता समोर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात ३ टक्के वाढ करण्याच्या प्रस्तावाला अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयासाठी केंद्र सरकारने तब्बल १०,०१६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.२८ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून, यामुळे कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता आता ६०% वरून वाढून थेट ६३% झाला आहे.

# कुंडलवाडीतील तीन शाळांना ओपन जिमची भेट;विद्यार्थ्यांच्या आरोग्याला मिळणार बळ

कुंडलवाडी/प्रतिनिधी-विद्यार्थ्यांचे शारीरिक आरोग्य सुदृढ राहावे, त्यांच्यामध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी आणि शालेय जीवनापासूनच निरोगी जीवनशैलीची सवय लागावी, या उद्देशाने कुंडलवाडी शहरातील तीन शाळांमध्ये ओपन जिमची सुविधा उपलब्ध झाली आहे. नगराध्यक्षा सौ.प्रेणाताई गजानन कोटलवार, उपनगराध्यक्षा सौ. नेहा शैलेश ऱ्याकावार तसेच सर्व नगरसेवकांनी खा.डॉ. अजित गोपछडे यांच्याकडे ओपन जिमसाठी मागणी करून सातत्याने पाठपुरावा केला होता.

खा.डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रयत्नांतून ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशनच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधीद्वारे नांदेड जिल्ह्यातील शासकीय व अनुदानित शाळांमध्ये ओपन जिम योजना राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत कुंडलवाडी शहरातील कै. गंगाबाई पोतन्ना सब्बनवार शाळा, मिलिंद विद्यालय आणि जिल्हा परिषद हायस्कूल या तीन शाळांमध्ये ओपन जिमची सुविधा उपलब्ध झाली आहे. विद्यार्थ्यांचे शारीरिक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी आणि त्यांची शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी नियमित व्यायाम महत्त्वाचा आहे. ओपन जिममधील विविध व्यायाम उपकरणांमुळे विद्यार्थ्यांना शाळेच्या परिसरातच व्यायाम करता येणार आहे. यामुळे त्यांच्यामध्ये नियमित व्यायामाची सवय निर्माण होण्यास मदत होईल.व्यायामामुळे शरीराची लवचिकता, स्नायूंची ताकद, संतुलन आणि शारीरिक क्षमता विकसित होण्यास मदत होते. तसेच विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढून व्यायामाचे महत्त्व त्यांच्या लक्षात येईल. कुंडलवाडीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांसोबतच शारीरिक विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या हेतूने नगराध्यक्षा सौ. प्रेणाताई गजानन कोटलवार, उपनगराध्यक्षाआणि सर्व नगरसेवकांनी पुढाकार घेतला. खा.डॉ.अजित गोपछडे यांच्याकडे केलेली मागणी आणि त्यासाठी केलेल्या पाठपुराव्यामुळे शहरातील तीन शाळांमध्ये ओपन जिमची सुविधा उपलब्ध झाली आहे.शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देणारा हा उपक्रम कुंडलवाडी शहरासाठी महत्त्वपूर्ण ठरत असून, विद्यार्थ्यांमध्ये व्यायामाची आवड निर्माण करण्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

# कायदा सर्वांचे संरक्षण करण्यास सक्षम-न्या.रवींद्र राठोड

देगलूर/प्रतिनिधी-जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांनी अभ्यास केला पाहिजे. जीवनात कोणत्याही टप्यावर कोणत्याही संकटाला न घाबरता त्याचा सामना करा कारण कायदा सर्वांचे संरक्षण करण्यासाठी सक्षम आहे असे प्रतिपादन देगलूर दिवाणी न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र राठोड यांनी येथील मानव्य विकास विद्यालयात मेरा बचपन सुरक्षित बचपन अभियान अंतर्गत आयोजित कार्यक्रमात केले.

यावेळी न.पा.चे मुख्याधिकारी नीलम कांबळे, गटशिक्षणाधिकारी बालाजी गोडाजी, अ‍ॅड.रामराव नाईक, मुख्याध्यापक संतोष कोल्हे, वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. विरेंद्र पाटील, अ‍ॅड. पवार मॅडम, अ‍ॅड.पल्लवी कळसकर, अ‍ॅड. श्रद्धा हसनाळे, अ‍ॅड. अब्दुल रज्जाक, अ‍ॅड. योगेश्वर वरखिंडे, अ‍ॅड. अवधूत राजकुंवार, अ‍ॅड. रुखसाना रज्जाक आदी उपस्थित होते.यानंतर शाळेच्या वतीने सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रास्ताविक भाषणात अ‍ॅड. विलायत अली यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पॉक्सो कायद्याविषयी सविस्तर माहिती दिली. यानंतर अ‍ॅड. श्रद्धा हसनाळे यांनी विद्यार्थ्यांना लैंगिक शिक्षणा बद्दल माहिती देऊन लहान बालकांवर होणाऱ्या अत्याचार व त्यापासून संरक्षण कसे मिळवावे याबद्दल सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे मुख्याध्यापक संतोष कोल्हे यांनी देगलूर दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश व सर्व टीमचे शाळेत आयोजित केलेल्या कार्यक्रमाबद्दल आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन शिवानंद स्वामी आणि अ‍ॅड. इनामदार यांनी केले.

# विष्णुपुरीत १५० दलघमी पाणी; तरीही जनावरे तहानलेली

## एमआयडीसीचा पाणीउपसा बंद करुन तीन पाणीपाळ्या सोडण्याची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-विष्णुपुरी-अंतेश्वर-दिग्रस प्रकल्पात अंदाजे १५० दलघमी पाणी उपलब्ध असल्याचा दावा करत ग्रामीण भागातील शेतकरी आणि पशुधनासाठी विष्णुपुरी कालव्यातून तातडीने तीन पाणीपाळ्या सोडाव्यात, अशी मागणी विष्णुपुरी प्रकल्प लाभार्थी संघर्ष समितीने केली आहे. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची गरज पूर्ण होईपर्यंत एमआयडीसीचा पाणीउपसा तात्पुरता बंद करण्याची मागणीही समितीने केली आहे.

प्रकल्पात पाणीसाठा उपलब्ध असतानाही शेतकरी आणि पशुधनाला पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. उद्योगांसाठी पाणी उपलब्ध होते; मात्र ग्रामीण भागातील जनावरांसाठी पाणी सोडण्याबाबत निर्णय होत नसल्याने समितीने नाराजी व्यक्त केली आहे. नांदेड शहराच्या पिण्याच्या पाण्याची सुरक्षित व्यवस्था कायम ठेवून उर्वरित पाण्याचे न्याय्य नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.या प्रश्नाकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने लक्ष द्यावे, असे आवाहन समितीने केले आहे. या मागणीसाठी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर, शिवाजीराव पाटील दगडगावकर, त्र्यंबक पाटील जानापुरीकर, लिंगोजी पाटील हरबळकर, माधवराव देसाई, सुरेशराव बोरगावकर, काशिनाथ पाटील पळशीकर, देवराव देसाई, खुशाल पाटील दगडगावकर, रघुनाथराव मोरे आणि परमेश्वर मोरे यांनी पुढाकार घेतला आहे.शेतीसाठी नंतर पाणी द्या; आधी माणसांची आणि गोठ्यातील जनावरांची तहान भागवा. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून तीन पाणीपाळ्या सोडाव्यात, अशी ठाम भूमिका लाभार्थी शेतकऱ्यांनी मांडली आहे.

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४०२/२०२६
(CNR No.MHND10-001351-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | विजय राजाराम राठोड | वय-६० वर्षे | धंदा-शेती |
| २ | साहेबराव पि.राजाराम राठोड | वय-५२ वर्षे | धंदा-शेती |
| ३ | कांतीलाल पि.राजाराम राठोड | वय-५० वर्षे | धंदा-शेती |
| | अर्जदार क्र.१ ते ३ रा.सोनमाळ तांडा ता.कंधार जि.नांदेड | | |
| ४ | शेषाबाई भ्र.पांडू चव्हाण रा.दुर्गातांडा ता.कंधार जि.नांदेड | वय-६२ वर्षे | धंदा-घरकाम |
| ५ | कमलबाई भ्र.परसराम पवार रा.जयरामतांडा ता.कंधार जि.नांदेड | वय-५८ वर्षे | धंदा-घरकाम |

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ५ ची आई वालुबाई भ्र.राजाराम राठोड हे होते ते दिनांक २१/०७/२०२४ रोजी सोनमाळ तांडा, ता. कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, वालुबाई भ्र.राजाराम राठोड यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत वालुबाई भ्र.राजाराम राठोड यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत वालुबाई भ्र. राजाराम राठोड यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-३०/११/२०२६

आज रोजी दि.२२/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक** | **सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय | सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार | क.स्तर,कंधार

## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड, यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १६६४/२०२६
कमळबाई व इतर वि. निरंक
ने.ता.१०/१२/२०२६

अर्जदार:- १. कमळबाई भ्र.रामराव देशमाने, वय : ४६ वर्षे, धंदा-घरकाम, रा.वाघाळा,मीरानगर, शाहुनगर, तरोडा बु.नांदेड, २. दीपाली पि.रामराव देशमाने, दीपाली भ्र.सागर गाजरे वय : ३६ वर्षे, धंदा-घरकाम, रा.शिव प्रेरणा चाळ न.१, रुम क्र.२, गणेशनगर, गणेश मंदीर मागे, दिवा पु.ठाणे, ३. दगडु पि.रामराव देशमाने, वय : ३३ वर्षे, धंदा-मजुरी, रा.घर क्र.१०-३-३१२, मीरानगर, हडको, सिडको, नांदेड, ४. साईनाथ पि.रामराव देशमाने, वय : ३० वर्षे, धंदा-शिक्षण, रा.घर क्र.१०-३-३१२, मीरानगर, हडको,सिडको,नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत रंगनाथ पि.रामभाउ रांजणे यांचा मृत्यु दिनांक २६/०९/२०२५ रोजी तरोडा खु., नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ हा मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा मुलगी व अर्जदार क्र. ३ व ४ हे मुले आहेत. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ ते ४ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक १०/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

स्वाक्षरित/- | आदेशावरुन
क. लिपिक | स्वाक्षरित/-
सह दिवाणी न्यायालय, | सहा.अधिक्षक
क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

पान १ वरुन **विधान परिषद निवडणुकीत...**

### नागपूर पदवीधरमध्ये भाजपची सरशी

नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपचे सुधाकर कोहळे यांनी ६१ हजार २१५ मते मिळवली. काँग्रेसचे अभिजीत बंजारी यांना ५७ हजार ५२ मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसमधून हकालपट्टी झालेले नितेश कराळे मास्तर यांना २४ हजार २४९ मते मिळाली. ते तिसऱ्या स्थानावर राहिले.

### अमरावतीत शिंदे गटाच्या शिवसेनेचा विजय

अमरावती शिक्षक मतदारसंघात शिंदे गटाच्या शिवसेनेचे उमेदवार किरण सरनाईक यांनी १३ हजार ६६१ मते मिळवत विजय मिळवला. शिवसेनेचे बंडखोर उमेदवार श्रीकांत देशपांडे यांना ७ हजार ७१७ मते, तर काँग्रेसच्या अदिती पोहरे यांना ७ हजार ५६६ मते मिळाली.

CHANGE IN NAME

My (old name) is TASNEEM BANU which now I am, changing as (new name) TASNEEM BANO
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
TASNEEM BANO
R/o 5-1-319, Fateh buruj nagar galli,
Itwara Nanded-431604
Mob.no. 9860116940

CHANGE IN NAME

My (old name) is CHITKALWAR ATHARV DATTATARAY which now I am, changing as (new name) ATHARV DATTATRAY CHITKALWAR
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
ATHARV DATTATRAY CHITKALWAR
R/o 5-4-566, Vinkar colony Chophala,
Nanded-431604
Mob.no. 8767548817

### पुणे पदवीधरमध्ये हर्षदा देशमुख जाधव विजयी

पुणे पदवीधर मतदारसंघात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या हर्षदा देशमुख जाधव यांनी १ लाख ११ हजार ३४९ मते मिळवली. भाजपच्या स्मिता जाधव यांना १ लाख २ हजार ४७९ मते मिळाली. ठाकरे गटाच्या शिवसेनेचे उमेदवार सुनील मोदी यांना ३ हजार ६६ मते मिळाली.

### मराठवाडा पदवीधरमध्ये...

या मतदारसंघातील राजकीय लढतीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला यश मिळाले. या निकालामुळे छत्रपती संभाजीनगरसह पुणे पदवीधर मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयाची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

### नागझरी जलाशयाला भगदाड;...

चालू आहे. आजचे लहान भगदाड भविष्यात मोठे होऊन धोका निर्माण होण्याची शक्यतेचे अनेकांनी भाकीत केले आहे. दैनंदिन देखभालीसाठी असलेल्या कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ प्रशासनाला लेखी स्वरूपात याची जाणीव करून दिली असेल तर प्रशासनाने आजपर्यंत या प्रकरणाला का गांभीर्याने घेतले नाही? असा शेतकऱ्यांचा सवाल आहे. गाळमुक्त नागझरी जलाशय करण्याची यावर्षी नामी संधी आली आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर रोजगार हमी योजनेतून जलाशयाची उंची वाढवण्यासाठी युद्ध पातळीवर कामे हाती घेऊन रोजगारांच्या हाताला काम द्यावे. सिंचनक्षेत्राच्या वाढीसाठी कालवे देखील गाळने भरले असून भगदाड पडल्याने आवर्तनाचे पाणी चक्क जमिनीत मुरते. म्हणून कालव्याचे सीसीकरण करणे काळाची गरज बनली असून पाण्याचा अपव्यय सुद्धा टळेल. जवळपास २८ हजार लोकसंख्या असलेल्या किनवट शहराला याच जलाशयातून पाणी पुरवठा होत असतो. शहराची वस्तीवाढ झपाट्याने वाढत आहे. त्यातुलनेत जलाशयातील पाणी साठा वाढवायचा असेल तर गाळमुक्त जलाशय झालाच पाहिजे, असे तमाम शेतकऱ्यांची मागणी जोर धरू लागली आहे.

### आंध्रप्रदेशात चक्रीवादळाचा...

परिणाम झाला असून, २२ एक्स्प्रेस आणि पॅसेंजर गाड्या ५ नोव्हेंबरपर्यंत रद्द करण्यात आल्या किंवा त्यांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. विशाखापट्टणम-किरंदुल आणि राउरकेला-जगदलपूर मार्गावरील गाड्यांनाही फटका बसला आहे. हिराखंड एक्स्प्रेसचा मार्ग तात्पुरता बदलण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रज्जाक यांच्या सिमा प्रिंटींग अँण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४